# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०१/२०२०

| | | |
|---|---|---|
| श्री.अमित रंगराव कोपार्डेकर | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. के.आय.टी अभियांत्रिकी महाविद्यालय (स्वायत्त) गोकुळ शिरगाव, कोल्हापूर.<br>२. के.आय.टी अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर गोकुळ शिरगाव, कोल्हापूर. | } | वि.प. |

के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय (स्वायत्त), गोकुळ शिरगाव, ता. करवीर, जि.कोल्हापूर या महाविद्यालयाकडील प्रयोगशाळा सहाय्यक श्री.अमित रंगराव कोपार्डेकर यांनी दि.१२/०३/२०२० रोजी समितीकडे तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१. तक्रारदार यांनी मुद्या क्रं. १ मध्ये स्वताःची शैक्षणिक माहिती दिलेली आहे. एसएससी, एचएससी, आय.टी.आय.डिझेल इंजिन मेकॅनिक, आय.टी.आय.मोटर व्हेईकल मेकॅनिक, डिप्लोमा इन ऑटोमोबाईल, एमएससीआयटी, कला पदवी (बी.ए)

२. माझी नेमणूक के.आय.टी. संस्थेकडे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर दि.२५/०२/२००४ पासून सुरवातीस तात्पुरती स्वरूपाची करण्यात आली होती. त्यानंतर संस्थेने मला पत्र क्रं. के.आय.टी/पी.एफ. /२२४ दि.२९/०३/२००७ नुसार मला दि. ०१/०४/२००७ पासून के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रयोगशाळा सहाय्यक या पदनामावर कायमस्वरूपी नेमणूक करून मला ३०५०-७५-३९५०-८०-४५९० या कनिष्ठ लिपीक पदनामाची वेतनश्रेणी देण्यात आली. वास्तविक पाहता शासन पत्रकानुसार मला २००७ साली ३२००-८५-४९०० ही वेतनश्रेणी द्यायला हवी होती. त्यामुळे माहे एप्रिल २००७ ते ऑक्टोंबर २०१० पर्यंतची शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह फरकाची रक्कम मिळणेस मी पात्र आहे.

३. के.आय.टी.संस्थेने सर्व कर्मचाऱ्यांना सुधारीत सहावा वेतन आयोग माहे ऑक्टोंबर २०१० साली लागू करण्यात येवून वेतनश्रेणी निश्चिती मात्र जानेवारी २०११ पासून करण्यात आली त्यावेळेस के.

आय.टी. संस्थेने मला त्यावेळच्या सुधारीत सहाव्या वेतन आयोगामध्ये ५२००-२०२०० ग्रेडपे रू.२००० ही वेतनश्रेणी दिली. वास्तविक पाहता इतर कर्मचाऱ्यांच्या प्रमाणे आणि शासन निर्णयानुसार ५२००-२०२०० ग्रेड पे रू.२४०० ही वेतनश्रेणी देणे गरजेचे होते. त्यामुळे मला सदर ग्रेडपे २४०० प्रमाणे होणाऱ्या शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह रक्कम मिळणेस मी पात्र आहे.

४. माझी दि.०१/०४/२०१९ रोजी के.आय.टी. संस्थेकडे प्रयोगशाळा सहाय्यक पदनामावर कायमस्वरूपी नेमणूक होवून विनाखंड १२ वर्ष सेवा झालेली असून त्यामुळे मी माझ्या पहिल्या कालबध्द् पदोन्नतीच्या लाभाचे फायदे मिळणेस पात्र आहे. के.आय.टी संस्थेने मला माझ्या पहिल्या कालबध्द् पदोन्नतीनुसार ५२००-२०२०० ग्रेड पे रू.२२०० दिलेला आहे. वास्तविक पाहता मला शासन नियमानुसार इतर कर्मचाऱ्यांच्या प्रमाणे ५२००-२०२०० ग्रेडपे रू.२७०० (२४००+३००) देणे गरजेचे होते, त्यामुळे मला सदर ग्रेडपे २७०० प्रमाणे होणाऱ्या शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह फरकाची रक्कम मिळणेस मी पात्र आहे. कारण माझ्याकडे उपलब्ध असलेली के.आय.टी संस्था व्यवस्थापनाकडून मंजूर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कायम नेमणूक तथा वेतनश्रेणीच्या ठरावाची नक्कल आपण जर पाहीली असता त्यामध्ये माझ्या सोबत बाकीचे इतरही कर्मचारी आहेत, त्यामध्ये 'क.लिपिक पदनामावर कार्यरत असणा-या कर्मचाऱ्यांच्या त्यांना मिळणाऱ्या १२ वर्षाच्या कायमस्वरूपी सेवेनंतर मिळणाऱ्या या पहिल्या कालबध्द् पदोन्नतीच्या लाभानुसार व महाराष्ट्र शासन, वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक आप्रयो ११०९/प्र.क्र.४१/सेवा-३ मंत्रालय, मुंबई-३२, दि.०५ जुलै २०१० हा शासन निर्णय डावलून के.आय. टी व्यवस्थापणातील व अस्थापणा विभागातील काही कारभा-यांनी संगनमताने वरील नमूद केलेल्या कर्मचा-यांना वेतनश्रेणी ग्रेड पे मध्ये रू.२०० इतकी वाढ करण्याऐवजी रू.५०० इतकी नियमबाह्य, चुकीची व बेकायदेशीररित्या वाढ करून सदरच्या क.लिपिक पदनामावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांचा ग्रेड पे हा रू.१९००+५०० एकुण २४०० इतका नियमबाह्य, चुकीचा व बेकायदेशीररित्या करण्यात आलेला आहे. आणि माझ्या वेतनश्रेणीची इतर पात्र प्रयोगशाळा सहायक पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीनुसार वेतनश्रेणी-ग्रेड-पे ची निश्‍चिती न करताच, माझ्या ग्रेडपे मध्ये रू.२००/- ची नाममात्र वाढ करून तो ग्रेडपे २००० + २०० एकुण रू.२२०० इतका कमी करून एकच संस्थेच्या एकच प्रशासकीय अस्थापना कार्यालयात असणाऱ्या माझ्या सारख्या कर्मचाऱ्याला एक नियम आणि त्याच प्रशासकीय अस्थापना कार्यालयात कार्यरत असणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांना वेगळा नियम अश्या चुकीच्या व बेकायदेशीर नियमबाह्य नियमावलीचा वापर करून माझ्या पहिल्या कालबध्द् पदोन्नतीच्या लाभातील वेतनश्रेणी ग्रेडपे सोबत माझ्या मासिक पगारात मोठी तफावत ठेवून के.आय.टी. व्यवस्थापनातील व अस्थापना विभागातील काही कारभाऱ्यांनी माझ्याशी पक्षपातपणा केलेला आहे याचा मी निषेध करतो.

सबब आपण याकरिता वरील नमुद केलेला अश्वासित प्रगती योजनेचा (पहिल्या कालबद्ध पदोन्नती बाबत) शासन निर्णय आणि माझ्या सोबतच्या ज्या कर्मचाऱ्यांची पहिल्या कालबध्द पदोन्नतीमध्ये नियमबाहृय वेतनवाढ केलेली आहे, त्यांचीही आणि माझीही मुळ पगारपत्रके आपण के.आय.टी व्यवस्थापनाच्या अस्थापना विभागाकडून मागवून घेवून पडताळून पहा आणि याची सखोल खातेनिहाय चौकशी करून मला न्याय द्यावा ही आपणास विनंती.

५. माझ्या सोबत सदर प्रयोगशाळा सहाय्यक/प्रयोगशाळा सहाय्यक कम तंत्रज्ञ पदनामावर नेमलेले श्री.अमोल मधुकर खोत आणि श्री.दिपक शशिकांत पिसाळ यांची शैक्षणिक पात्रता ही माझ्यापेक्षा कमी असून सुध्दा त्यांना महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे त्यावेळच्या सुधारीत सहाव्या वेतन आयोगामध्ये प्रयोगशाळा सहाय्यक या पदाची ५२००-२०२०० ग्रेड पे रू.२४०० ही वेतनश्रेणी त्यांच्या कायमस्वरूपी नेमणूक झालेल्या दिवसापासून वा महिन्यापासून वेतन निश्चिती करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे के. आय.टी. संस्थेने वरील प्रमाणे नमूद केलेले कर्मचारी आणि माझ्या वेतनश्रेणीमध्ये तफावत ठेवून पक्षपातपणा केलेला आहे. तसेच भारतीय राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांचा भाग म्हणून भारतीय राज्य घेटनेतील कलम ३९ आणि समान पदनाम - समान काम - समान पगार हया शासकीय नियमांची पायमल्ली करून व सदरचा नियम धुडकावून लावून, मला माझ्या भारतीय संविधानाने दिलेल्या मुलभूत अधिकारावर घाला करीत तसेच माझ्या बाबतीतच वेतन श्रेणीतील ग्रेडपे मध्ये भेदभाव केलेला आहे. त्यानुसार सदरची बाब ही चुकीची, बेकायदेशीर आणि नियमबाहय आहे. त्यानुसार वरील नमुद केलेल्या दोघां कर्मचाऱ्यांची आणि सोबत माझीही शैक्षणिक पात्रतेबाबतची सर्व कागदपत्रे आणि कायमस्वरूपी नेमणूक झाल्याबाबत कार्यालयीन पत्रे आपण के.आय.टी व्यवस्थापणाच्या अस्थापना विभागाकडून मागवून घेवून पडताळून पाहा, त्यामध्ये आपणांस सर्व काही समजेल की कोण पात्र आणि कोण अपात्र आहे. त्यानुसार एकाच संस्थेच्या एकाच प्रशासकीय अस्थापना कार्यालयात असणाऱ्या माझ्या सारख्या तांत्रिक पदनामावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याला एक नियम आणि त्याच प्रशासकीय अस्थापना कार्यालयात असणाऱ्या वरील प्रमाणे दोघां आणि इतर कर्मचाऱ्यांना वेगळा निमय लावलेला आहे. अश्या चुकीच्या व बेकायदेशीर नियमबाहय नियमावलीचा वापर करून के.आय.टी व्यवस्थापनाने मला माझ्या वेतनश्रेणी ग्रेडपे पासून वंचित ठेवलेले आहे. सोबत मिळालेला मासिक पगाराचा तक्ता परिशिष्ठ अ शासन निर्णयाप्रमाणे मला मिळणारा व होणारा मासिक पगाराचा तक्ता परिशिष्ठ ब म्हणून व परिशिष्ठ अ आणि परिशिष्ठ ब मध्ये होणारी फरकाची रक्कमेचा परिशिष्ठ क म्हणून सोबत जोडलेला आहे. सदर परिशिष्ठ हे माझ्या तक्रारीचा भाग आहे तसेच मी के.आय.टी. संस्थेकडे सन २००७ ते २०१९ आज

अखेर पर्यंत केलेल्या सर्व पत्रव्यवहाराची प्रत महाराष्ट्र शासनाचे निर्णय इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक आदेश पगार पत्रक आणि शैक्षणिक पात्रतेबाबतचा तक्ता सोबत जोडला आहे.

६. महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार (वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, शासन निर्णय क्रं. वाभह-२०१४/प्र.क्र.-०५/सेवा ५ दिनांक ०३ जून २०१४) दरमाह वाहतूक भत्ता दिनांक ०१/०४/२०१४ पासून रक्कम रू.४००/- मला देणे गरजेचे होते. परंतू वास्तविक पाहता आजतागायत संस्था मला रू.१५०/- प्रमाणेच दर माह मासिक वाहतूक भत्ता देत आहे. त्यानुसार सदरच्या दिलेल्या व होणाऱ्या वाहतूक भत्त्याची शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह फरकाची रक्कम मिळणेस मी पात्र आहे.

७. महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार (वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, शासन निर्णय क्रं. घभाभ-१००९/प्र.क्र.-६७/सेवा ५ दिनांक २४ ऑगस्ट २००९) प्रमाणे के.आय.टी. संस्थेने मासिक घरभाडे भत्ता हा पाचव्या वेतन आयोगानुसार १५ टक्के आणि सहाव्या वेतन आयोगानुसार २० टक्के दराने देणे गरजेचे होते व आहे. परंतू के.आय.टी. संस्थेने मला आजतागायत मासिक घरभाडे भत्ता हा पाचव्या वेतन आयोगानुसार ०५ टक्के (कालावधी अ माहे एप्रील २००७ ते माहे जुलै २००९ दरम्यानच्या कालावधी मध्ये) इतका कमी आणि सदर नमुद केलेल्या कालावधी मध्ये बाकीच्या इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १५ टक्के या प्रमाणे आणि सहाव्या वेतन आयोगानुसार १० टक्के (कालावधी ब-माहे सप्टेंबर २०१४ ते आजतागायत) इतक्या कमी दराने दिलेला आहे. त्यानुसार सबळ पुराव्या करिता आपण मी नमूद केलेल्या अ-कालावधी मधील इतर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पगार पत्रके के.आय.टी संस्थेकडून मागवून पाहू शकता, त्यामध्ये माझ्या पगारातील आणि इतर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पगारातील मिळणारा घरभाडे भत्त्याची टक्केवारी यातील तफावत दिसून येईल. त्यानुसार के.आय.टी संस्थेने माहे सप्टेंबर २०१४ पासून कोणतेही कारण मला न देता माझा घरभाडे भत्ता दर हा २० टक्के वरून तो १० टक्के इतका कमी करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदरची बाब ही चुकीची व बेकायदेशीर आहे. त्यामुळे सदरच्या दिलेल्या व होणाऱ्या घरभाडे भत्त्याची शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह फरकाची रक्कम मिळणेस मी पात्र आहे.

८. तसेच महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार (वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, शासन निर्णय क्रं. मभवा-१३१९/प्र.क्र.-३०/सेवा ९ दिनांक ०४ जानेवारी २०२०) शासन निर्णयानुसार के.आय.टी. संस्थेने मासिक महागाई भत्ता हा सहाव्या वेतन आयोगानुसार १६४ टक्के दराने देणे गरजेचे होते व आहे परंतु के.आय.टी संस्थेने मला आजतागायत मासिक महागाई भत्ता हा सहाव्या वेतन आयोगानुसार

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

९५ टक्के इतक्या कमी दराने नियमबाहय (माहे नोव्हेंबर २०१६ पासून ते आजतागायत) सध्या देत आहे. त्यानुसार सबळ पुराव्याकरिता आपण इतर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पगार पत्रके के.आय.टी. संस्थेकडून मागवून २०१६ पासून आपण सर्व रेकार्ड पाहू शकता. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडून वरील नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार महागाई भत्ता हा १६४ टक्के न देता संस्था ९५ टक्के इतक्या कमी दराने आणि ६९ इतकी मोठी तफावत ठेवून आणि शासकीय नियम डावलून आजतागायत मला देत आहे. त्यानुसार सदरची बाब ही चुकीची व बेकायदेशीर आहे त्यामुळे माझे खुप आर्थिक नुकसान होत आहे त्यानुसार सदरच्या दिलेल्या व होणाऱ्या महागाई भत्याची शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह फरकाची रक्कम मिळणेस मी पात्र आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

सदरचे कर्मचारी हे संस्थेकडे प्रयोगशाळा सहायक या पदावर दि.०१/०४/२००७ पासून कार्यरत आहेत.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

त्यांच्या दि.२०/०१/२०२० रोजीच्या नोटीशीचे उत्तर संस्थेने वकीलांमार्फत दि.२७/०२/२०२० रोजी दिले आहे. त्यामध्ये सर्व बाबी नमूद आहेत. त्यामुळे श्री अमित रंगराव कोपार्डेकर यांनी उपस्थित केलेली मागणी चुकीची व तथ्यहिन आहे हे स्पष्ट होते.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये के.आय.टी. संस्थेकडे आपली नेमणूक प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर दि. ०१/०४/२००७ पासून आहे. या पदाची वेतनश्रेणी रू.३२००-८५-४९०० अशी आहे. तथापि संस्था/महाविद्यालयाकडून या पदाची वेतनश्रेणी न देता आपणास रू.३०५०-७५-३९५०-८०-४५९० अशी कनिष्ठ लिपीक या पदनामाची असणारी वेतनश्रेणी देण्यात आली आहे. आपण सन २००८ पासून वेळोवेळी संस्था व महाविद्यालयाकडे याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. तथापि याबाबत कार्यवाही झालेली नाही. आपणास नियमानुसार ३२००-८५-४९०० ही वेतनश्रेणी धरून माहे एप्रिल २००७ ते ऑक्टोंबर २०१० पर्यंतची शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह फरकाची रक्कम मिळण्यास तो पात्र आहे अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या लेखी म्हणण्यामध्ये तक्रारदार श्री.कोपार्डेकर यांना त्यांच्या शैक्षणिक अहर्ततेनुसार देण्यात आलेली वेतनश्रेणी योग्य आहे असे नमूद केले आहे.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे अवलोकनी घेता समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी तक्रार अर्जासोबत जोडलेल्या तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडील दि.२६ ऑगस्ट २०१५ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियमाखाली प्राप्त झालेल्या पत्रातील माहितीवरून सदर कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था, अशासकीय अनुदानित संस्था व विना अनुदानित संस्थामध्ये तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक (वेतनश्रेणी ५ व्या वेतन आयोगामध्ये ४०००-१००-६०००) व अतांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक (वेतनश्रेणी ५ व्या वेतन आयोगामध्ये ३२००-८५-४९००) अशी दोन पदे मंजूर असल्याचे तसेच अतांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक या पदाची शैक्षणिक अहर्ता दहावी पास व तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक या पदाची शैक्षणिक अहर्ता संबधित दहावी पास व संबधित शाखेतील पदविका अशी असल्याचे दिसून येते.

तक्रारदार यांची संस्थेकडे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर दि.०१/०४/२००७ रोजी (वेतनश्रेणी ३०५०-७५-३९५०-८०-४५९०) नियुक्ती झालेचे तसेच नियुक्ती वेळेस त्यांची शैक्षणिक अर्हता १० वी पास व आयटीआय उत्तीर्ण अशी असल्याचे निदर्शनास येते. तक्रारदार यांनी आपले मागणीत ५ व्या वेतन आयोगाच्या अतांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरिता शिफारस केलेल्या ३२००-८५-४९०० या वेतनश्रेणीनुसार त्यास वेतन देणे गरजेचे होते असे कथन केलेले आहे. त्यामुळे तक्रारदाराची प्रथम नेमणूक ही प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) या पदावर झाली असल्याचे अनुमान काढता येते. त्याच्या प्रथम नेमणूक नियुक्तीचे नेमणूक पत्रात तो प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) या पदावर नियुक्त झालेला आहे असे स्पष्ट केलेले नाही. ज्या अर्थी प्रथम नियुक्तीच्या वेळेला प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक) या पदाची आवश्यक अहर्ता त्याज जवळ नव्हती हे तक्रारदार कबूल करतो त्या अर्थी त्याची नेमणूक ही प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) म्हणून होती असे अनुमान ही समिती काढत आहे. अतांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर नियुक्ती होताना तक्रारदार यांची शैक्षणिक अहर्ता १० वी पास व आयटीआय अशी होती. तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता १० वी पास व संबधित शाखेतील पदवीका अशी होती. याबाबत तक्रारदाराचा आक्षेप नाही. अतांत्रिक पदाची नेमणूक स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरिता आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता/अहर्ता मिळविण्याचे प्रयत्न केले ही बाब तक्रारदाराने अमान्य केलेली नाही. तसेच नेमणूकीचे दरम्यान किंवा नोकरीच्या कालावधीत अतिरिक्त शैक्षणिक पात्रता/अहर्ता मिळविण्याकरिता संबधित महाविद्यालय किंवा संस्थेची लेखी पुर्व परवानगी घेतलेली नाही ही बाब तक्रारदाराने मान्य केलेली आहे.

महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण सहिंता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम १९८४ मधील तरतूदी दि.०१ मे १९८४ पासून लागू करण्यात आल्या होत्या. त्या अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयांना लागू झालेल्या होत्या. त्या तरतूदीतील नियम क्रं.४१ उपनियम १६ अन्वये अशा संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठे यांच्या कर्मचाऱ्यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय आपल्या सेवेच्या कालावधीमध्ये अतिरिक्त शैक्षणिक अहर्ता प्राप्त करण्यास मनाई करण्यात आलेली होती. त्याच नियमांच्या कलम ४२ नुसार महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण सहिंता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम १९८४ च्या कोणत्याही प्रावधानाचा भंग करणे किंवा त्या प्रावधानांच्या विरूध्द् एखादे कार्य करणे ही गैरवर्तणूक समजण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली होती. सक्षम अधिका-याच्या पुर्वपरवानगीशिवाय आपण शैक्षणिक अहर्ता वाढविली ही बाब तक्रारदाराने आपल्या समिती समोरील निवेदनात मान्य केलेली आहे. त्यामुळे तक्रारदारास सदर प्राप्त करून घेतलेल्या अधिकच्या शैक्षणिक अहर्ततेचा कोणताही उपयोग करून घेता येणार नाही आणि त्यायोगे कोणतेही लाभ मिळविता येणार नाही असा या समितीचा निष्कर्ष आहे. हे जरूर आहे की, वर नमूद केलेली प्रमाण सहिंता शासन निर्णय २० मे २०१० अन्वये रद्द करणेत आलेली आहे. तदनंतर अकृषी विद्यापीठांनी किंवा यथास्थिती संचालक, उच्च शिक्षण संचालक, तंत्र संचालक यांनी अकृषी विद्यापीठांशी सलंग्नित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर पदांच्या भरती प्रक्रियेसंदर्भात सेवाप्रवेश नियम तयार करणे अभिप्रेत असतानाही दि.२९/०१/२०१४ पर्यंत असे सेवाप्रवेश नियम तयार न करण्यात आल्यामुळे शासनाने अकृषी विद्यापीठांशी संबधित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सेवाभरती नियमाबाबत शिक्षकेत्तर पदांसाठी नविन सेवाप्रवेश नियम अमंलात येईपर्यंत अकृषी विद्यापीठे व संलग्नित विद्यापीठे प्रमाण सहिंता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम १९८४ च्या तरतूदीनुसार भरती करण्यास मान्यता दिली. शासन पूरक पत्र क्र.संकिर्ण २०१३/(८७/२०१३)/विशि-१ दि.२९ जानेवारी, २०१४ या निर्णयामध्ये प्रमाण सहिंता नियमांचा उपयोग फक्त भरती करताच होईल असे म्हटलेले नाही. त्यामुळे १९८४ च्या प्रमाण सहिंता नियम प्रस्तूत प्रकरणास लागू पडू शकतील असे या समितीचे नम्र मत आहे.

२. तक्रारदार संस्थेमध्ये कार्यरत असणारे प्रयोगशाळा सहा/प्रयोगशाळा सहायक कम तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असणारे श्री.अमोल मधूकर खोत व श्री.दिपक शशिकांत पिसाळ यांच्या समकक्ष वेतनश्रेणी मागत आहेत. त्यांचे कथनानुसार या दोघांची शैक्षणिक पात्रता कमी असून सुध्दा त्यांना महाराष्ट्र शासन निणर्याप्रमाणे त्यावेळच्या सुधारित वेतन आयोगाप्रमाणे प्रयोगशाळा सहाय्यक या पदांची ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० ही वेतनश्रेणी त्यांची कायमस्वरूपी नेमणूक झालेपासून निश्चित करून दिलेली आहे. व त्याप्रमाणे हे दोन कर्मचारी व स्वताः तक्रारदार यांच्या वेतनश्रेणीमध्ये तफावत ठेवून त्यावर अन्याय केला

आहे. सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांवरून श्री.अमोल खोत व श्री.दिपक पिसाळ यांची प्रयोगशाळा सहाय्यक तांत्रिक या पदावर नेमणूक करतेवेळी त्यांची शैक्षणिक अहर्ता ही १० वी, १२ वी व पदविका अशी असल्याची दिसते. तर वर नमूद केल्याप्रमाणे नेमणूकीच्या वेळी तक्रारदाराची शैक्षणिक अहर्ता १० वी पास अशी असल्याचे व त्याची नेमणूक प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) या पदावर झालेची दिसून येते. त्यामुळे तक्रारदारास या दोघांच्या व स्वताःच्या वेतनश्रेणीमध्ये व ग्रेडपे देण्यामध्ये तफावत असल्याचे म्हणता येणार नाही. वर नमूद केल्याप्रमाणे सक्षम अधिकाऱ्याची पुर्व परवानगी न घेता नोकरीच्या कालावधीतील मिळवलेल्या अधिकच्या शैक्षणिक पात्रतेचा कोणताही लाभ तक्रारदारास घेता येणार नाही. तत्कालीन प्रमाण सहिंतेच्या तरतूदी अनुसार तक्रारदाराचे कृत्य गैरकृत्य म्हणून समजले जाते आणि त्या गैरकृत्याचा तक्रारदार लाभ घेऊ शकत नाही.

राज्य शासन निर्णय क्र. संकिर्ण/(२०१०/३१२/२०१०)/विशि-१, दि. २० मे, २०१० अन्वये दि. १ मे, १९८५ पासून शिक्षकेत्तर पदांसाठी लागू असलेले तत्कालीन महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालय प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व शर्ती) नियम, १९८४ च्या तरतूदी शासनाने रद्द केल्या आणि सामरिक परिनियम तयार करून ते लागू होईपर्यंत प्रमाण संहित नियमाच्या ऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात यावा, असा निर्णय घेतला. आजतागायत सामरिक परिनियम तयार करून त्या लागू न झाल्याचे दिसून येते. त्यामुळे आज शिक्षकेत्तर पदांकरीता महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू पडतो. तथापि, सदर महाराष्ट्र नागरी सेवा नियमामध्ये कर्मचाऱ्यांना आपल्या सेवा काळात अधिकची शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याकरीता सक्षम अधिका-याची पूर्व परवानगी घ्यावी की न घ्यावी याबद्दलची कोणतेही स्पष्ट नियम दिसून येत नाही. त्याच शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील नियमाच्या आधारे प्रकरण हाताळत असताना जर काही बाबींवर अडचणी उद्भवल्या तर त्या बाबींवर निर्णय घेण्याकरीता किंवा शिफारसी करण्याकरीता एक समिती गठित करण्यात आली असल्याचे दिसून येते. सदर समितीचा कालावधी शासन निर्णय निर्गमित झालेल्या तारखेपासून ६ महिन्यांचा असल्याचे दिसते. अशी समिती प्रत्यक्षात अस्तित्वात असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वर नमूद केलेल्या प्रश्नांची उत्तरे आज या समितीला शोधून काढता येत नाही. कोणत्याही कर्मचा-याला आपल्या सेवा कालावधीत सक्षम अधिका-याची पूर्व परवानगी घेतल्या शिवाय अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त करता येत नाही. महाराष्ट्र शासनाच्या निर्णय क्रं. ईआरएन-१४८८/१०५३/८३/१२-अ दि.०२/११/१९८८ अन्वये महाराष्ट्र शासनाने शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या सेवांच्या दरम्यान शासकीय कामकाजास उपयुक्त असा अभ्यासक्रम पुर्ण करून त्याबाबींची पदवी/पदवीका प्राप्त करून घेण्याकरिता केलेल्या खर्चाच्या ५० टक्के किंवा रूपये

२०००/- फक्त या पैकी कमी असलेल्या रक्कमेची प्रतिपुर्तता करण्याबाबत काही अटींवर मान्यता दिलेली आहे. त्या अटीतील अट क्रं. ३ मध्ये हे स्पष्टपणे नमूद केलेले आहे की अभ्यास क्रमात प्रवेश घेण्यापुर्वी शासनाची पुर्व संमती घेतली पाहीजे अशाच प्रकारची अट महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये प्रमाण सहिंता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व शर्ती) १९८४ च्या नियम ४१ उपनियम १६ मध्ये असल्याचे आम्ही वर नमूद केलेले आहे. सेवेदरम्यान आपली शैक्षणिक अहर्ता वाढविण्या करिता सक्षम अधिका-याची पुर्व परवानगी घेणे ही कायद्याची ठाम तरतूद आहे. त्यामुळे हा मुद्दा वरील शासन निर्णयात नमूद केलेल्या समितीकडे जाण्यास पात्र होतो. परंतु, आज ती समिती अस्तित्वात नाही त्यामुळे त्या प्रश्नाची उकल होवू शकत नाही. या समितीचे मत असे आहे की, तत्कालीन सेवा संहितेच्या आणि कायद्याच्या स्पष्ट तरतूदीचा प्रभाव प्रस्तूत प्रकरणात देखील लागू पडतो. त्यामुळे तक्रारदाराने उपरोक्त शैक्षणिक पात्रता प्राप्त करण्याकरीता सक्षम अधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते, असे या समितीचे मत असून सेवा काळात विना परवानगी प्राप्त करून घेतलेली अतिरिक्त शैक्षणिक पात्रतेचा उपयोग तक्रारदार करून घेवू शकत नाही, असे या समितीचे ठाम मत आहे.

३. तक्रारदाराचे असेही कथन आहे की, दि.०१/०४/२००७ पासून संस्थेने आणि महाविद्यालयाने प्रयोगशाळा सहायक या पदावर कायमस्वरूपी नेमणूक करून ३०५०-७५-३९५०-४५९० ही क.लिपिक पदनामाची वेतनश्रेणी दिली. परंतू त्यास ३२००-८५-४९०० ही वेतनश्रेणी देय होती त्यामुळे माहे एप्रील २००७ ते माहे आक्टोंबर २०१० या कालावधीची सर्व फेरफारासह रक्कम मिळण्यास तो पात्र आहे. प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) या पदाला ३२००-८५-४९०० ही वेतनश्रेणी लागू होती ही बाब संस्था, महाविद्यालयाने नाकारलेली नाही. तसेच त्याला क.लिपिक पदनामास लागू असणारी ३०५०-७५-३९५०-४५९० ही वेतनश्रेणी दिलेली नाही ही बाब मान्य केलेली आहे. परंतू ही कमी वेतनश्रेणी तक्रारदारास का देण्यात आली याबाबत कोणताही खुलासा संस्था, महाविद्यालयाने दिलेला नाही. केवळ तक्रारदाराने कमी वेतनश्रेणीवर नेमणूक मान्य केली आणि त्यानुसार वेतन स्विकारले ही बाब तक्रारदाराच्या वैधानिक अधिकारांवर लागू पडू शकत नाही. कदाचित काही अडचणींमुळे तक्रारदाराने संस्था किंवा महाविद्यालय यांनी देऊ केलेली कमी वेतनश्रेणी मान्य केली असेल. काही गरजेपोटी देखील त्याने ती मान्य केली असेल ही बाब प्रतिबंध (Estoppel) ठरू शकत नाही. त्यामुळे तक्रारदाराची त्यास देय असणारी वेतनश्रेणी ३२००-८५-४९०० ही वेतनश्रेणी आणि त्यास प्रत्यक्षात दिलेल्या ३०५०-७५-३९५०-४५९० या वेतनश्रेणीतील फरक व त्यावर देय असणाऱ्या भत्यांचा फरक मिळण्यास तक्रारदार पात्र आहे असे या समितीचे निरिक्षण आहे.

४. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५ दि.१६/१२/२०१६ नुसार झेड या वर्गवारीत येणाऱ्या गावांकरिता घरभाडे १० टक्के दराने देण्यात यावा असे आदेश निर्गमित झालेले आहेत. संबंधित संस्था व महाविद्यालय शहरी भागात येते हे दाखविण्याकरिता दि.१७/०३/२०२३ च्या बैठकी दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने दि.१६/०८/२०१७ रोजी जारी केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४२ (क) अन्वये जारी करण्यात आलेले कोल्हापूर नागरी विकास क्षेत्राची अधिसूचना व त्या विकास क्षेत्रासाठी त्या कायद्याच्या ४२ (ग) नुसार नियुक्त करण्यात आलेल्या कोल्हापूर नागरी क्षेत्रविकास प्राधिकरणाची अधिसुचना व त्या सोबत असलेली अनुसूची अ भारताच्या २०११ साली झालेल्या जनगणनेची कोल्हापूर विभागाचे जनगणना हॅण्डबुक तसेच महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दि.१०/०१/२०२३ रोजी असुधारीत वेतन संरचनेत (६ व्या आयोगानुसार) वेतन घेणा-या राज्यशासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना अनुज्ञेय घरभाडे भत्याच्या दरात दि.०१ जुलै २०२२ पासून सुधारणा करण्याबाबत निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्रं.ममघवा-१३२२/प्र. क्र.१७/सेवा-९ क्रंमाकाचे शासन निर्णयाची प्रत समितीसमोर हजर केलेली आहे. गैर अर्जदार संस्था व महाविद्यालय गोकुळ शिरगाव या ठिकाणी स्थित असल्याचे उभयपक्षी मान्य आहे. गोकुळ शिरगाव हे कोल्हापूर शहरालगत असलेले ग्रामीण क्षेत्र असून त्या ठिकाणी आजही ग्राम पंचायत अस्तित्वात आहे ही बाब तक्रारदाराने आपल्या युक्तिवादामध्ये मान्य केलेली आहे. तसेच कोल्हापूर शहराची हद्दवाढ झालेली नसून त्यात गोकुळ शिरगाव गावाचा समावेश कोल्हापूर शहरात झालेला नाही हे देखील तक्रारदाराने दि. १७/०३/२०२३ च्या युक्तिवादात मान्य केलेले आहे. तक्रारदाराने दाखल केलेल्या आणि वर नमूद केलेल्या शासनाच्या नगरविकास विभागाच्या अधिसूचनेचा अर्थ ऐवढाच होतो की, त्या अधिसूचनेचा अनुसूचिमध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या क्षेत्राचा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ या कायद्या अंतर्गत विकास करण्याकरिता त्या क्षेत्राला विकास क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. आणि त्या करिता एक विकास प्राधिकरण नियुक्त करण्याची अधिसूचना जारी करण्यात आलेली आहे. या पलिकडे या कागदपत्रांचा कोणताही उपयोग तक्रारदाराला गोकुळ शिरगाव हे ग्रामिण क्षेत्र शहरी भागात येते हे दाखविण्याकरिता होत नाही. गोकुळ शिरगाव हे अद्याप ग्रामिण क्षेत्र आहे आणि त्यानुसार मिळणारा घरभाडे भत्ता तक्रारदारास मिळण्यास तो पात्र आहे. त्यामुळे संस्था व महाविद्यालयाचे म्हणणे कायदेशीर वाटते आणि तक्रारदारास त्यानुसार १० टक्के दराने घरभाडे देण्यात येत असून ते योग्य आहे असे या समितीचे मत आहे. त्यामुळे तक्रारदाराची वाढीव घरभाडयाची मागणी योग्य नाही असे या समितीचे मत आहे.

५. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार (वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, शासन निर्णय कं.वाभह-२०१४/प्र.क्र.-०५/सेवा ५ दिनांक ०३ जून २०१४) आपणास दरमाह वाहतूक भत्ता दिनांक ०१/०४/२०१४ पासून रक्कम रू.४००/- देणे गरजेचे होते. परंतू वास्तविक पाहता आजतागायत संस्था रू.१५०/- प्रमाणेच दर माह मासिक वाहतूक भत्ता देत आहे. त्यानुसार सदरच्या दिलेल्या व होणाऱ्या वाहतूक भत्याची शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह फरकाची रक्कम मिळणेस आपण पात्र असल्याचे नमूद केले आहे.

संस्था व महाविद्यालयाकडून या तक्रारीबाबत कोणतेही लेखी अथवा तोंडी म्हणणे देण्यात आलेले नाही. सबब तक्रारदार यांना नियमानुसार देय असणारा वाहतूक भत्ता देणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

६. तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार (वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, शासन निर्णय कं.मभवा-१३१९/प्र.क्र.-३०/सेवा ९ दिनांक ०४ जानेवारी २०२०) शासन निर्णयानुसार के.आय.टी. संस्थेने मासिक महागाई भत्ता हा सहाव्या वेतन आयोगानुसार १६४ टक्के दराने देणे गरजेचे होते व आहे परंतु के.आय.टी संस्थेने आपणास आजतागायत मासिक महागाई भत्ता हा सहाव्या वेतन आयोगानुसार ९५ टक्के इतक्या कमी दराने नियमबाहय ( माहे नोव्हेंबर २०१६ पासून ते आजतागायत) सध्या देत आहे. त्यानुसार ९५ टक्के इतक्या कमी दराने आणि ६९ टक्के इतकी मोठी तफावत ठेवून आणि शासकीय नियम डावलून आजतागायत देत आहे. त्यानुसार सदरची बाब ही चुकीची व बेकायदेशीर आहे त्यामुळे माझे खुप आर्थिक नुकसान होत आहे त्यानुसार सदरच्या दिलेल्या व होणा-या महागाई भत्याची शासकीय नियमानुसार सर्व फेरफारासह फरकाची रक्कम मिळणेस मी पात्र असल्याचे म्हटले आहे.

संस्था व महाविद्यालयाकडून या तक्रारीबाबत कोणतेही म्हणणे देण्यात आलेले नाही. तथापि तक्रारदार यांनी महाविद्यालयातील इतर कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या महागाई भत्याचा दर व आपणास देण्यात येणारा महागाई भत्याचा दर यामध्ये भेदभाव केला जातो असा दर्शविणारा कोणताही पुरावा समितीसमोर सादर केलेला नाही. तथापि तक्रारदार यांच्या नियुक्ती आदेशामध्ये नमूद केलेनुसार प्रचलित नियमानुसार देय होणारे भत्ते तक्रारदार यांना देण्यात यावेत असे समितीचे मत आहे.

सबब ही समिती खालील आदेश पारित आहे.

## आदेश

१. तक्रारदाराची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे. तक्रारदाराची ३२००-८५-४९०० या वेतनश्रेणीनुसार होणाऱ्या सर्व फेरफाराची मागणी मंजूर करण्यात येत आहे. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांना एप्रील २००७ ते माहे ऑक्टोंबर २०१० पर्यंत रू.३२००-८५-४९०० या वेतनश्रेणीनुसार होणाऱ्या वेतनाच्या रक्कमेतून त्यांना प्रत्यक्ष देण्यात आलेली वेतनाची रक्कम वजा करून उर्वरित फरकाची रक्कम आदेश मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत अदा करावी.

२. तक्रारदाराची ५२००-२०२०० ग्रेड पे २७०० या वेतनश्रेणीची मागणी व त्या ग्रेडपे नुसार होणाऱ्या सर्व फेरफाराची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

३. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदारास दि.०१/४/२०१४ पासून नियमानुसार देय असणारा वाहतूक भत्ता व त्याची थकबाकीची रक्कम तीन महिन्याच्या आत अदा करावी.

४. तक्रारदाराची वाढीव घरभाडयाची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

५. तक्रारदार यांची वाढीव महागाई भत्त्याची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविण्यात यावे.

दिनांक : 0 6 APR 2023

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री. एस.यु.शिंदे)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

Ankalekar
(डॉ. ओ. एन. कोलेकर)

(prof. Hangirgekar S.P.)